MHAH160001152022

## फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ४०/२०२२ मधील निशाणी ५ खालील आदेश

१. अर्जदाराने प्रस्तुत मुळ अर्ज गैरअर्जदाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलाचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज नि. ५ हा अर्जदाराने तिला अंतरिम पोटगी मिळावी याकरिता न्यायप्रविष्ठ केला असून अर्जाकामी गैरअर्जदाराचे म्हणणे मागविले. गैरअर्जदार क्र. १ ते ९ यांनी अर्ज नि. ५ ला त्यांचे म्हणणे नि. २० कडे दाखल केलेले आहे. अर्जदाराकडून विधिज्ञ श्रीमती एस.जे.नेहे आणि गैरअर्जदाराकडून विधिज्ञ श्री.बी.जी. वैदय यांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज अंतरिम पोटगीकरिताचा आहे. प्रस्तुत अर्ज निकाली काढण्याकरिता अर्ज आणि अर्जावरील म्हणणे पाहता खालील प्रश्न उपस्थित होतात. सदर प्रश्न आणि त्यांवरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ कडून मागणीप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय असल्यास किती ? | अशंत होय.<br>अर्जदार दरमहा रक्कम रुपये ४,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>प्रश्न क्रमांक १ करिता</u>**.

२. अर्जदाराने प्रस्तुत मुळ अर्ज गैरअर्जदाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलाचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार आणि सामनेवाला क्र. १ हे पती–पत्नी आहेत. सामनेवाला याने अर्जदाराचा कोणत्याही वैध कारणाशिवाय त्याग केला असून ती सदयस्थितीत माहेरी आश्रीत म्हणून राहत आहे. यादरम्यान गैरअर्जदार यांनी अर्जदाराला कोणतीही अन्नवस्त्राची रक्कम दिलेली नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराचा त्याग केला आहे. अर्जदार स्वतःचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे. तिला कोणताही कामधंदा नाही. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट सामनेवाला हे गोदावरी जल विदयुत प्रकल्प बेझे, त्रंबकेश्वर येथे नोकरीला असून त्यापासुन त्यांना दरमहा रुपये पंचवीस हजार पगार मिळतो. त्यांच्यावर अर्जदाराशिवाय कोणीही अवलंबुन नाही. सामनेवाला याने अर्जदाराचा त्याग केलेपासुन तिच्या अन्नवस्त्राची कोणतीही तरतुद केलेली नाही. सामनेवाला हे आर्थिकदृष्टया संपन्न् असून अर्जदाराला पोटगी देण्यास सक्षम आहे. अर्जाचा निकाल होण्यास अदयाप अवधी आहे. दरम्यान अर्जदाराची उपासमार होत आहे. सबब गैरअर्जदाराकडून अर्जाचा निकाल होईपावेतो अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये सात हजार अंतरिम पोटगी मिळावी अशी विनंती अर्जदारांनी केलेली आहे.

३.		गैरअर्जदार क्र. १ ते ९ यांनी अर्जदाराचे अर्जाला म्हणणे नि. १३ देत विरोध केलेला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जदाराने खोटया आशयाचा अर्ज दाखल केलेला आहे. लग्न जमतेवेळी सामनेवाला हे गौतमी गोदावरी जलविदयुत प्रकल्प बेझे ता.त्रंबकेश्वर येथे कामाला होते मात्र तेथे जोडप्याला राहण्याची सोय नाही याची माहिती अर्जदाराला असूनही अर्जदाराने विवाहानंतर तेथे राहण्याचा हट्ट धरला, आणि तो पुर्ण झाला नाही म्हणून सामनेवाला याचा त्याग केला. अर्जदार ही धडधाकट असून शेतात काम करते. त्यापासुन पुरेसे उत्पन्न तिला आहे. अर्ज खोटा आहे. सामनेवाला याची अर्जदाराला पोटगी देण्याची ऐपत नाही. त्यास नोकरी नाही. अर्जदाराने सामनेवाला यांचा स्वतःहुन त्याग केला असल्याने तिला पोटगीचा अधिकार नाही. सबब प्रस्तुत अर्जास कारण नाही. अर्ज आणि अर्जातील कथने धांदात चुकीची आणि खोटी आहेत. सबब अर्जदाराचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती सामनेवाले यांनी केली आहे.

४.		अर्ज आणि प्रकरणाचा अभिलेख पाहता उभयंतामधील नातेसंबध हे वादातीत नाहीत ही बाब समोर येते आहे. अर्जदाराचे कथनानुसार सामनेवाला हा गोदावरी जल विदयुत प्रकल्प बेंझे त्रंबकेश्वर येथे नोकरीला आहे आणि दरमहा निश्चीत पगार मिळवितो आणि तो अर्जदाराला पोटगी देण्यास सक्षम आहे. या ठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, सामनेवाला याचे असे कथन आहे की, लग्न होतेवेळी ते गौतमी गोदावरी जल विदयुत प्रकल्प बेझे त्रंबकेश्वर येथे नोकरीला होते, मात्र आता त्यांना नोकरी नाही. त्याकरिता सदर बाब सिध्द करण्याकरिता

सामनेवाला क्र. १ याने कोणताही कागदोपत्री दस्तऐवज जसे की, नोकरीहुन कमी केलेचा दाखला किंवा तसा आदेश दाखल केलेला नाही. सबब सामनेवाला याने मान्य केलेली बाब की, ते नोकरीला होते आणि अर्जदाराचे की, सामनेवाला हे गोदावरी जलविदयुत प्रकल्पात नोकरीला आहेत ही बाब सामनेवाला याने पुरावा देवून खोडुन काढलेली नाही. सबब सामनेवाला क्र. १ हा अर्जदाराच्या कथनानुसार नोकरी करतो ही बाब सिध्द झालेली आहे. मात्र त्यास नेमका किती पगार मिळतो याकरिता अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

५. अर्जदार ही सामनेवालाकडून दरमहा रुपये सात हजारांचे अंतरिम पोटगी मागणी करीत आहे मात्र अर्जदाराच्या तोंडी कथनाशिवाय इतर कोणताही पुरावा अर्जासोबत दाखल नाही. प्रस्तुत अर्ज नि. ५ चे स्वरुप पाहता तो अंतरिम पोटगीकरिता आहे. अर्जातील कथने पाहता अर्जदार ही सामनेवाला याची पत्नी आहे तो तिचा नैसर्गीक पालनकर्ता आहे. अशा परिस्थीत गैरअर्जदाराने अर्जदाराची त्याची पत्नी या नात्याने अन्नवस्त्राची तरतुद करणे आवश्यक आहे.

६. अर्जदाराने सामनेवाला याचा त्याग स्वतःहुन केला किंवा नाही ही बाब योग्य त्या संपरिक्षेअंती सिध्द करावी लागणार आहे. तुर्तास प्रस्तुत अर्ज हा अंतरिम पोटगीकरिता आहे आणि या स्थितीला गैरअर्जदार याने अर्जदाराकरिता कोणतीही तरतुद केली असे म्हणणे नाही. नि. २२ व ७ वरील उत्पन्न आणि दायित्वाचे प्रतिज्ञापत्रे पाहता, आणि वर्णनयादी नि. २४ समवेतचे अचल मालमत्तेचे

पुरावा पाहता न्यायदृष्टीने विचार करुन अर्जाचा निकाल होईपावेतो अर्जदाराला अंतरिम पोटगी देणे आवश्यक आहे. गैरअर्जदाराच्या उत्पन्नाचा तसेच जबाबदा– यांचा विचार करता तसेच त्याचा राहणीमानाचा दर्जा पाहता अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदाराकडून दरमहा रुपये सात हजार पोटगी मिळविण्यास पात्र नाही परंतु अर्जदार क्र. १ करिता गैरअर्जदार क्र. १ कडून दरमहा रुपये ४,०००/– अंतरिम पोटगी देणे रास्त व उचित ठरेल. सबब मी प्रश्न क्रमांक १ चे उत्तर अशंतः होकारार्थी देत आहे.

**प्रश्न क्रमांक २ करिता**.

७. प्रश्न क्रमांक १ ची कारण मिमांसा आणि त्यांची आलेले निष्कर्ष पाहता, अर्जदार ही गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. सबब अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी मुळ अर्जाचा निकाल होईपावेतो अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ४,०००/– (अक्षरी रक्कम रुपये चार हजार मात्र ) प्रस्तुत अर्जाचे दाखल तारखेपासुन दयावेत.

३.	अर्जाचा खर्च मुळ अर्जाच्या निकालावेळी गुणदोषावर ठरविण्यात येईल.

४.	या आदेशाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.
आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत करुन घोषीत केला.

दिनांक ०४.११.२०२३ (श्री. आर.के. गायकवाड )
अकोले न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अकोले.